**नि.क्र.१७० वरील आदेशाप्रमाणे साक्षीदाराचा जबाब**

**माझे नांव:-व्यंकटेश जयराम बिरादार, वय:- ४६** वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी, **रा.** अहमदपूर.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.जी.कोरे यांच्यामार्फत सुरु.**

**०१.** मी परिरक्षक भूमापक आहे. मला न्यायालयीन समन्स आलेले आहे. कोर्ट कमीशनर म्हणून उपअधिक्षीक, भूमी अभिलेख यांची नेमणूक या प्रकरणी झाली होती. त्यांनी मला आदेशीत करून या प्रकरणी मोजणी करण्याविषयी सांगितले. अहमदपूर येथील स.क्र.१/२ आणि २/५ यांची मोजणी करायची होती. सदर दोन्ही स.क्रमांकाची हद्द निश्चिचीतीची ती मोजणी होती. तसेच, त्यात अतिक्रमण असल्यास ते दाखवायचे होते.

**०२.** मोजणीची तारीख निश्चित करुन तशा नोटीसा वादी, प्रतिवादी यांना पाठविल्या. त्या व्यतिरीक्त अन्य कोणाला नोटीसा पाठविल्या नाहीत. दि.२७/१२/२०२४ रोजी मोजणी करायची होती. मोजणी अर्ज, न्यायालयाचा आदेश, गाव नकाशा असे तीन कागद घेवून मी त्या ठिकाणी गेलो. वादी, प्रतिवादी तेथे हजर होते.

**०३.** वादी, प्रतिवादींनी दाखवलेल्या वहिवाटीच्या हद्दीप्रमाणे स.क्र.१/२ व २/५ आणि संपुर्ण स.क्र.१ व २ यांच्या हद्दी रोव्हर मशीनच्या सहाय्याने मोजल्या. त्यानंतर ऑफीसात येवून ऑफीसमध्ये उपलब्ध असलेले रेकार्ड स.क्र.१ चे मुळ टिपन व त्याचे पोट हिस्सा टिपन व स.क्र.२ चे मुळ टिपन व त्याचे पोटहिस्सा टिपन मोजणी केलेल्या नकाशावर इम्पोज केले. अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या रेकार्डनूसार नकाशा तयार केला. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्र लाल रंगाने दाखविले. हिरव्या रंगाने दाखवलेले क्षेत्र प्रतिवादीच्या ताब्यातील वहिवाटीचे आहे. निळया शाईने दाखवलेले क्षेत्र वादीचे आहे. स.क्र.१/२ चे क्षेत्र २८ आर इतके जागेवर भरले. अतिक्रमीत क्षेत्र १ आर भरले. स.क्र.२/५ चे निळया शाईचे क्षेत्र १ हेक्टर ५२ आर एवढे भरले.

रेकार्डप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्र हे स.क्र.१ चा भाग आहे. नकाशाचा स्केल १: १००० सेंटी मीटर असा आहे. सदरचा नकाशा मी स्वत: तयार केलेला आहे. त्यातील नोंदी जागेवरील वहिवाटी व रेकार्डप्रमाणे बरोबर आहेत. त्यावर माझी, छाननी लिपीक अंतेश्वर राचमाले, मुख्यालय सहाय्यक राजेश कोरडे यांच्या सहया आहेत. नकाशास **नि.क्र.१७६** देण्यात येते.

**०४.** मी एम.ए., बी.एड आहे. परिरक्षक भूमापक म्हणून माझा सहा वर्षाचा अनुभव आहे. २०० ते २५० मोजण्या मी यापुर्वी केलेल्या आहेत. मोजणीची एकच पध्दत आहे. मोजणी करताना रोव्हर हे उपकरण वापरले जाते. २०२१ पासून ते प्रचलित झाले व वापरात आले. यापुर्वी ई.टी.एस. मशीन असायच्या. मोजणीची नोंद फिल्ड बुकमध्ये होत नाही. या मोजणीला मला कोणाचाही आक्षेप आला नाही. या मोजणीच्या वेळी वादी, प्रतिवादींशिवाय लक्ष्मण माणिकराव बोंडगे, उत्तम पंढरी कांबळे, हमीद महेबुबसाब शेख, मुंढे विठ्ठल भागवत या व्यक्ती हजर होत्या. मी या स.क्रमांकाच्या मुळ सीमा रेषा तपासल्या. मोजणीच्या वेळी शासनाने निश्चित केलेले रेफरन्स बिंदू मी पाहिले का यास माझे सांगणे असे रेफरन्स बिंदू शासनाने निश्चित केले नाहीत. प्रत्यक्ष जागेत इमारती आहेत. त्याठिकाणी झाड, कुंपण असे काही आढळले नाही. इमारतीचा अडसर मोजणी करताना झाला नाही. मी महाराष्ट्र भूमापन नियमा अंतर्गत मोजणी केली आहे. सदर नकाशा मी स्वत: तयार केला. नकाशा प्रमाणित स्केलप्रमाणे आहे. हा नकाशा अंतीम आहे. ही मोजणी १०० टक्के अचूक आहे. न्यायालयीन आदेशाची मी पुर्ण पुर्तता केलेली आहे. मोजणीसाठी सरासरी तीन ते चार तास वेळ लागला. रोव्हर हे जी.पी.एस.च्या माध्यमातून वापरायचे उपकरण आहे. अहमदपूर-काळेगांव रस्त्यात स.क्र.२/५ मधील किती क्षेत्र गेले याचा उल्लेख मी केला नाही, याचे कारण की तसा मला कोर्टाचा आदेश नव्हता. या सर्व्हे क्रमांकाच्या शेजारच्या सर्व्हे क्रमांकाची मी मोजणी केली नाही. स.क्र.२/५ याचा ७/१२ उतारा १ हेक्टर ४८ क्षेत्राचा आहे. परंतु, मुळ टिपन व पोट हिस्सा टिपनप्रमाणे त्याच्यामध्ये ४ आर अतिरीक्त म्हणजे १ हेक्टर ५२ आर दिसून येते. हिस्सा क्र.१/२ मध्ये मुळ टिपन आणि पोट हिस्सा टिपन याच्या आधारे येणारे क्षेत्र २८ आर असून ते ७/१२ पेक्षा १० आर जास्त आहे. सदरची

१० आर जमीन ही प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे माझे म्हणणे आहे. स.क्र.१/२ च्या पुर्वेला स.क्र.२/५, पश्चिमेला १/१, दक्षिणेला- अहमदपूर- अंबाजोगाई रस्ता आणि उत्तरेला स.क्र.२/५ आहे. मोजणीला गंगाधर हजर नव्हता कारण तो मयत आहे. त्याचे वारस होते. प्रतिवादींच्या सांगण्यावरुन मी चुकीच्या नोंदी नकाशात दाखवल्या हे खरे नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.देशमुख वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०५.** हे खरे नाही की, अतिक्रमीत क्षेत्र नेमके कोणत्या धारकाच्या कब्जात आहे, हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक ०६/१०/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**